
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 12 | AUG - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सामाजिक व्यवस्था परिवर्तनासाठी विनोबा भावे यांचे सर्वोदयी विचार

डॉ. के. बी. शिरसे
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख ,
गोपीकाबाई सीताराम गावंडे महा.
उमरखेड जि. यवतमाळ.

**प्रस्तावना:**



विनोबा भावे यांनी समाजामध्ये असलेला स्पृश्य — अस्पृश्य हा भेदभाव दुर करण्यासाठी अस्पृश्य उध्दाराचे कार्य केले. हरिजन सेवा सर्वधर्म समभाव स्वाध्याय इत्यादीवर प्रवचने दिली. विनोबा भावे यांनी सर्वोदयी ही नवी कल्पना राबविली. त्यांच्या मते सर्वोदय म्हणजे सर्वांचा उदय, सर्वोदय तत्त्वज्ञानाच्या एकूण विचार हा समन्वयाचा आहे. आपण सर्व मानव आहोत ही भावना सर्व खेडयात निर्माण झाली पाहिजे. त्यांच्या सर्वोदयाचा विचार सामाजिक समतेचा होता. त्यांनी आपल्या ग्राम स्वराज्य या पुस्तकात म्हटले आहे. मनात स्वतः बद्दल, परिवारा बद्दल प्रेम आहे. हा चांगला गुण आहे. परंतु त्याला मर्यादीत ठेवू नका, व्यापक करा, वैराग्य प्रचार हा आमचा हेतू नाही. आम्हाला तर प्रेमाचा विस्तार करावयाचा आहे. आजवर आपण आपला परिवार लहान मर्यादीत मानला आणि संकूचित बनलो, म्हणून अनेक दुःखे निर्माण झाली आहेत. आपण परिवाराला व्यापक करावे अशी आमची इच्छा आहे. आम्ही म्हणतो, आपण आपले कुटूंब व्यापक बनवीले पाहिजे. पण ते अतिव्यापक नसावे सहज ग्रहण होण्याइतकेच व्यापक असावे. समुद्राचे भय वाटते, त्यात पोहण्याची मनुष्याला हिंमत हात नाही हे आम्ही कबूल करतो. परंतू नाल्यातही धोके असतात. येथे अनेक प्रकारची घाण असते. म्हणून मी सांगत असतो तुम्ही हा छोटासा नाला पकडून ठेवला त्याने काम भागणार नाही. आम्हाला समुद्रही व्हायचे नाही, तर लहानशी सुंदर नदी बनायचे आहे. आजपर्यंत मानवतेचा जो विकास झाला तो विकास आणि विज्ञानाची मागणी लक्षात घेऊन तुम्ही आपले कुंटूब जे आज लहानशी नाल्यासारखे मर्यादीत आहे. गावाएवढे व्यापक केले पाहिजे. अशा प्रकारे आम्ही लहान नालाही सोडू इच्छितो आणि व्यापक समुद्र होण्याची आंकाक्षाही ठेवत नाही. आम्ही मधली स्थिती पसंत करतो. अशी स्थिती, जेथे सेवेला चांगल नाव राहिल आणि बुध्दीही व्यापक बनेल. सारांश, ग्राम—परिवार बनवण्याच्या कल्पनेत प्रेमाचा इतका विस्तार नाही की ते अव्यस्थ होईल. म्हणून हा एक व्यवहारीक कार्यक्रम आहे असे आम्ही समजतो. हा एक माध्यम मार्ग आहे, असा आमचा दावा आहे.

## गावातून कायदा हटवा :—

विनोबा भावे म्हणतात कायद्यापेक्षा समाजात प्रेम, जिव्हाळा मैत्रीभाव, सर्वोदयी सौदार्हया समानता निर्माण झाली पाहिजे. ते म्हणतात, काही लोक म्हणतात आहो घरात भावाभावाचे एकमेकांशी पटत नाही आणि तुम्ही सगळया गावाला एक करण्याची गोष्ट करता तर हे होणार कसे? हा प्रश्न विचारणाऱ्यांना वाटते की, त्यांना अगदी बिनतोड विचारला प्रश्न आहे आणि त्यामुळे मी निरुत्तर होईल परंतु घरात भावाभावाचे एकमेकांशी पटत नाही त्याचे कारण जेथे पुर्वी प्रेम होते तेथे आता कायदा दाखल झाला आहे. कायदयात प्रत्येकांचे हक्क असतात. भावांचे हक्क, बहिणीचे हक्क, पत्नीचे हक्क, हा कायदयामध्ये आला नसात तर घरात प्रेम कायम राहिले असते.

व्यक्तीगत मालक जेथे नष्ट होते तेथे कायदा दखल देत नाही. मग नाते भाऊ– भावाचे राहत नाही, तर मैत्रीचे होते. गावात मित्रसमाज निर्माण करण्याची, तेथून कायदा हटविण्याची माझी इच्छा आहे.

सर्वात खालचे, सर्वात तळाचे जे आमचे सोबती आहेत त्यांना जर आपण वर उचलुन घेणार नाही, तर तो आमच्यासाठी मोठा अभिशाप ठरेल, हाच महाभारताचा संदेश आहे. आपल्या शेवटच्या सोबत्याला आपण अंतर देवू शकत नाही. जे विद्या शक्ती, आरोग्य, संपत्ती, जमीन सगळयाच बाबतीत सर्वात खाली आहेत, त्यांना आम्ही अंतर देणार नाही. त्यांना आम्ही जमीन देउन आमच्या परिवारात दाखल करु आणि प्रेमात भिजवून टाकू. ते आमच्या परिवाराचेच अंग आहेत, असा विश्वास त्यांच्या मनात निर्माण करु असा विश्वास, अशी श्रध्दा निर्माण करणे हे आमचे काम आहे. हे झाले तर भारत टिकेल, नाहीतर तो छिन्न विछिन्न होवून जाईल. असा इशारा विनोबा भावे यांनी भारतीय समाजातील स्पृश्य जांतीना दिला आहे.

## समर्पणाचे तत्त्व :–

ग्रामदानात जमीनीची मालकी ग्रामसभेची राहील. भूमिहीनांना जमीन दिल्यानंतर जी जमीन उरेल ती पूर्वीचे मालकच कसतील. फक्त मालकी ग्रामसभेला अर्पण करतील. काही लोक म्हणतात, सुलभ ग्रामदानात मालकी नाममात्रच तर नष्ट होते, मग तेवढयाचा आग्रह का? भूमिहीनांनी जमीनीचा विसावा हीस्सा दयावा आणि प्रत्येकांनी उत्पन्नाचा चाळीसावा हिस्सा ग्रामसभेला द्यावा एवढे पुरेसे मानावे. मालकी हक्क मालकाकडे राहू दयावा. असे म्हणणारे माझ्या बुध्दीची परीक्षा घेत आहेत. मी त्यांचे म्हणजे कबूल केले तर क्रांतीची प्रक्रीयाच कुंठीत हाईल. मालकी हक्क सोडणे हे आमच्या क्रांती प्रक्रीयेचे मुळसुत्र आहे. व्यक्तीगत मालकी नट होते हीच क्रांती आहे. सुलभ ग्रामदानात ती नाममात्र जरी नष्ट होत असली, केवळ पुढचे ग्रामदान पत्रावर सहया होत असल्या तरी हरकत नाही. पुढचे काम पुढच्या पिढया करतील. त्या निश्चित आमच्या पुढे जाणार आहेत. म्हणून जमीनीची मालकी ग्रामसभेच्या नावे करण्याचे क्रांतीचे हे सुत्र होण्याची माझी मुळीच तयारी नाही ते कायम ठेवून बाकी काय सुधारणा करावयाच्या असतील त्या करा. भेदांचे निमूर्लन करण्याच्या संदर्भात विनोबा भावे म्हणतात ग्रामदानी गावात सर्वात मोठी गोष्ट ही होईल की, सगळे मिळून रात्री भगवंताचे भजन करतील. ते खरे भक्त बनतील. कारण त्यांनी उच्च निच भेद ठेवलाच नसेल. संत माणिक्यवाचकरांनी म्हटले आहे की, जात, धर्म, कुळ इत्यादीच्या पंजातून सुटले पाहीजे. ग्रामदानी गावात उच्च – निच भेद राहणार नाही हे भेद नष्ट होईपर्यंत खऱ्या भक्तीचा उदय होत नसतो. हे भेद नष्ट होतील तेव्हा सर्वभक्त रात्री भागवतभजन करतील, आणि बिछान्यावरच नव्हे तर परमेश्वराच्या कुशीत झोपी जातील. ग्रामाचे एका मोठया परिवारात रुपांतर करावयाचे विचार विनोबा व्यक्त करतात. गावात मानवातावाद, आत्मज्ञान, विज्ञान याचा विकास झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. त्याचबरोबर सहजीवनाचा प्रारंभ झाला पाहीजे. ते म्हणतात ग्रामदान हा सामुहिक उत्थानाचा प्रयत्न आहे. आजवर परमार्थमार्गाने जाणाऱ्या लोंकानी आत्मोन्नतीसाठी विशेष प्रयत्न केला. काही भक्तीमार्ग लोकांनी परमार्थ सामूहीक क्षेत्रात आणाण्याचा प्रयत्न केला खरा, मात्र तो भजन कीर्तनापूरातच मर्यादीत राहीला. ते सहभजनापर्यंत पोहचू शकले. आधूनिक समाजसुधारक जे होते, ते केवळ सहभजनावर संतुष्ट न राहता सहभोजनापर्यंत पोहचू शकले. तेही आमच्यासाठी पुरेसे नाही. आम्हाला तर सहजीवनापर्यंत पोचायचे आहे. ग्रामनादातून सामुहिक जीवनाचा आरंभ होईल. ग्रामदानामुळे भौतिक जीवन सुखी हाईल हे तर अगदी स्पष्ट आहे. परंतु ग्रामदानामुळे परमार्थासाठी पाया तयार होतो, ही त्याहून स्पष्ट गोष्ट आहे. विनोबाजींच्या मते ग्रामदानाचे काही फायदे आहेत ते सारांश रुपाने खालीलप्रमाणे सांगता येतील.

1) शोषणाच्या आधाराने उभी असलेली आर्थिक– सामाजिक रचना लोकांच्या संमतीने बदलून ग्रामदान, समता आणि शोषणहीन शोषणरहित समाजाची स्थापणा करते.
2) ग्रामदान गावकऱ्यांना उत्पादन वाढण्याची प्रेरणा देते.
3) गावातील लोकच गावातल्या उत्पादनाचा भाव ठरवतील, अशी व्यवस्था ग्रामदान करते.
4) ग्रामदान गावाच्या आयात – निर्यातीवर अंकुश लावते.
5) ग्रामदान अल्पमत – बहूमताच्या भांडणापासून मुक्तता करते, सर्वसंमती किंवा सर्वानूमतीने काम करण्याचा अभ्यास करवते.
6) विचार – परिवर्तन ग्रामदानाचेच होवू शकते. व्यवस्था परिवर्तन व सामज परिवर्तनासाठी भलेही सभेचा उपयोग होवो.

7) ग्रामदानामुळे गावातल्या कच्च्या मालावर गावातच प्रक्रीया करण्याची व्यवस्था होवू शकते. याचा देषाच्या आर्थिक धोरणावर प्रभाव पडू शकतो.
8) ग्रामदान समुचित युनिट ( एकक) बनवण्याचा अवसर देते.
9) ग्रामदानामुळे मजुरांना जमीन मिळेल, त्यांच्या कामात प्राण येईल, उत्पादन वाढले.
10) ग्रामदान गावकऱ्यांना सामुहिकपणे विज्ञानाचा लाभ करुन घेण्याची योग्यता प्रदान करते.

विनोबाजी म्हणतात सामुहिक जीवनाकडे आम्ही लोकांना प्रवृत करु इच्छितो आपल्याजवळ जे काही आहे ते समाजाला समर्पण करण्याचा भावनेचेच नाव आहे. ग्राम स्वराज्य लोकांनी आपला कारभार स्वतः चालवावा राजत्तेवर प्रेजेचा अंकुश असणे, यातच लोकशाहीचे सार आहे. लोकशाहीचा आधार गावावरच आहे. पोस्ट रेल्वेसारखी कामे केंद्र सरकारने पहावी. बाकी सगळी महत्वाची कामे गावकऱ्यांनी करावी. गावातून धर्मभेद व जातीभेदांना तिलांजली दयावी. असे झाले तरच भारताचे स्वातंत्र्य आणि लोकशाही टिकू शकतील. लोकशाहीत सत्ता लोकांच्याच हाती आसली पाहीजे, आणि तिचे गावागावात विरतण झाले पाहीजे राज्यसत्ता बलवान झाली तर लोकशाहीला धोका आहे. ग्रामदानातच लोकशाहीचा पुर्ण विकास करण्याची क्षमता आहे.

अशा प्रकारे विनोबा भावे यांनी भारतीय समाजमध्ये असलेला स्पृश्य – अस्पृश्य हा भेदभाव दूर करण्यासाठी अस्पृश्य उध्दाराचे कार्य केले. अस्पृश्य सेवा सर्वधर्म समभाव. स्वाध्याय इत्यादीवर प्रवचने व साहीत्याच्या रुपाने प्रबोधन केले. विनोबाजीनी सर्वोदय ही कल्पना राबवीली सर्वोदय म्हणजे सर्वांच्या उदय सर्वोदय तत्वज्ञानाचा एकूण विचार हा सामाजिक व जातीय समन्वयाचा आहे. आपण सर्व मानव आहोत ही भावना निर्माण झाली पाहीजे. त्यांचा सर्वादयाचा विचार सामाजिक स्वरुपाचा होता.

## संदर्भ सूची :–

1) विनोबा – ग्रामस्वराज्य (विनायक नरहर भावे)
2) चोळकर डॉ. पराग – भूदान ग्रामदान आंदोलन एक नजर
3) धर्माधिकारी दादा – सर्वोदय दर्शन
4) मेहता बबलभाई – सर्वोदय दर्शन
5) विनोबा – भारताचा धर्मविचार
6) विनोबा – समता आजचा युगधर्म
7) विनोबा – ( विनाबाजीची जीवनकथा त्यांच्यात शब्दात)